923

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८,
## वैद्यकीय विभाग
## सभावृत्तांत

दिनांक – ६/०६/२०१६

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांची विविध विषयांवर चर्चा करणेकामी त्रैमासिक आढावा बैठक दि.४/०६/२०१६ रोजी दु.१२.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीकरिता खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री. दिनेश वाघमारे, आयुक्त तथा अध्यक्ष
२. श्री. बबनराव झिंझुर्डे, अध्यक्ष, कर्मचारी महासंघ, तथा उपाध्यक्ष
३. डॉ. के अनिल रॉय, आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा कार्याध्यक्ष
४. श्री. प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल तथा सदस्य
५. श्रीमती पद्मश्री तळदेकर, मुख्यलेखापरिक्षक तथा सदस्य
६. डॉ. मनोज देशमुख, वैद्यकीय अधिक्षक तथा सदस्य
७. श्री. चंद्रकांत इंदलकर, कामगार कल्याण अधिकारी तथा सदस्य सचिव
८. श्री. मेहेर लहारे, प्रशासन अधिकारी, प्रशासन (सहा.आयुक्त प्रशासन यांचे प्रतिनिधी)
९. श्री. मनोज माछरे, सहखजीनदार, कर्मचारी महासंघ तथा सदस्य
१०. श्री. मधुकर रणपिसे, सहखजीनदार, कर्मचारी महासंघ तथा सदस्य
११. श्रीमती रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी (महिला) तथा सदस्य

धन्वंतरी स्वास्थ्य योजनेची अंमलबजावणी करित असतांना वेळोवेळी उदभवणा-या समस्यांविषयी तसेच कर्मचा-यांमार्फत प्राप्त होणा-या तक्रारींचे अनुषंगाने चर्चा करणेकरिता बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेवर होणारा खर्च विचारात घेता प्रत्येक सभासदाकडून घेण्यात येणारी मासिक वर्गणीची रक्कम वाढविणेबाबत व त्याप्रमाणे मनपाचा दुप्पट हिस्सा निधीमध्ये जमा करुन घेण्याबाबत तरतूद करणेकामीचा विषय प्रलंबित ठेवणेबाबत निर्णय घेण्यात आला. तथापि, योजनेमध्ये होणा-या खर्चावर नियंत्रण ठेवणेकरिता पॅनलवरील रुग्णालयांमध्ये दाखल होण्यापूर्वी वैकल्पिक स्वरुपाच्या शस्त्रक्रियांकरिता (Elective Procedures) महानगरपालिकेच्या रुग्णालयातून रेफर चिट घेवून मगच (तातडीचे उपचार वगळता) उपचाराकरिता दाखल करण्यात यावे.

२. धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरणाकरिता कार्याध्यक्ष म्हणून आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तथापि, आदेश क्र. वैद्य/१/कावि/७७३/२०१६ दि. ३/०५/२०१६ अन्वये कार्याध्यक्ष म्हणून अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना नियुक्त करणेकामी आदेश निर्गत करण्यात आलेले आहे. अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी

दि.१३/०५/२०१६ रोजीचे पत्रान्वये कार्याध्यक्ष पदाचे कामकाज मा.महापालिका सभेचे मान्यतेने निर्गत करणे आवश्यक आहे असे कळविलेले आहे.

तथापि, आयुक्तांमार्फत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना कार्याध्यक्ष पदाचे कामकाजाबाबत विचारणा करण्यात आली असता आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचेकडील कामकाजाचा ताण लक्षात घेता धन्वंतरी योजनेचे बिलांचे मंजूरीचे व स्वाक्षरी करण्याचे अधिकार हे अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपविणेकामी विनंती केलेली आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण मधील अट क्र. २३ (आ) व (ई) अन्वये आयुक्त यांना कोणत्याही अधिका-याकडे धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे कामकाज सोपविण्याचे अधिकार प्राप्त आहेत. तसेच सदरचे धोरणांस मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली असल्यामुळे कार्याध्यक्ष बदलणेकरिता वरील अटीनुसार मा.महापालिका सभेचे परवानगीची आवश्यकता नाही. सबब, याकामी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना बिलांचे तपासणी करुन मान्यता देणेकामीचे सर्व अधिकार देण्यात यावेत. याकामी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी स्वतंत्र आदेश निर्गत करणेकरिता मा.आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. तसेच अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी आदेशाचे पालन करण्यास कसूर केल्यास त्यांचेवर नियमाधीन कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.

३. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये सर्व आजारांवर उपचार करण्याची तरतूद आहे. तथापि फक्त Dental, Cosmetic Surgery, Stem cell इ. उपचार त्यामधून वगळण्यात आलेले आहेत. परंतु काही प्रकरणांमध्ये असे निदर्शनास आलेले आहे की कोणत्याही छोट्या व किरकोळ कारणाकरिता कर्मचारी उपचारार्थ रुग्णालयामध्ये दाखल होत आहेत व त्यामुळे बिलांचे व पर्यायाने खर्चाचे प्रमाण वाढलेले आहे. यावर नियंत्रण ठेवणेकरिता वैद्यकीय अधिक्षक यांनी छोट्या व किरकोळ आजारांची (Faculty wise) यादी तयार करुन ती धन्वंतरी समितीपुढे मान्यतेकामी सादर करावी व असे आजारांवर यापुढे धन्वंतरी योजनेअंतर्गत उपचार पुरविण्यात येणार नाही. जेणेकरुन योजनेमध्ये होणारा अनावश्यक खर्च टाळणे शक्य होईल. सदर बाबत तातडीने परिपत्रक निर्गत करुन धन्वंतरी योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयांना याबाबत कळविण्यात यावे.

४. धन्वतंरी स्वास्थ्य योजनेतून र.रु. १५,०००/- पेक्षा जास्त खर्च झाल्यास त्यावर नियमानुसार आयकर कपात करणेत यावा असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, मुख्यलेखापाल यांनी मे.नगरे असोसिएट्स यांचे पत्राचा संदर्भ देवून अशा प्रकारे झालेल्या खर्चाकरिता आयकर भरण्याची आवश्यकता नाही असे नमूद केलेले आहे.

५. नियमितपणे किरकोळ स्वरुपाच्या तपासण्या कराव्या लागणा-या व दुर्धर आजारांकरिता नियमितपणे औषधांची आवश्यकता असलेल्या कर्मचा-यांना खर्चाची प्रतिपूर्ती करुन देण्यास दि. १२/०२/२०१६ रोजी झालेल्या समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली होती. तथापि, याकामी नियमितपणे आवश्यक असलेल्या किरकोळ स्वरुपातील तपासण्या व दुर्धर

आजाराकरिता असलेल्या औषधांचे रकमेकरिता वेगवेगळी कमाल खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात यावी. सदर बाबतचे दर निश्चित करण्यात आल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

६. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेकरिता उपचार घेणा-या रुग्णांकरिता उपचार खर्चाची कमाल मर्यादा ही र.रु. २० लाख इतकी असून ती र.रु. १० लाख इतकी करणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तथापि, अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी १० लाखांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आलेल्या रुग्णांची संख्या पाहता सदरची मर्यादा कमी करण्यात येवू नये तसेच १० लाखांपेक्षा अधिकचा खर्च उपचाराकरिता आवश्यक असलेल्या रुग्णांबाबत सहानुभूतीने विचार करण्याची आवश्यकात असल्याने अशी विनंती केलेली आहे. याकामी र.रु. १० लाखापेक्षा खर्च करण्यात आलेल्या बिलांची संख्या पाहता त्यावर आजपर्यंत र.रु.४५,७४,१६९/- इतका खर्च झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सद्यस्थितीत उपचार खर्चाची कमाल मर्यादा कमी करण्याची तुर्तास आवश्यकता नाही. भविष्यात आवश्यकता वाटल्यास त्याचा फेरविचार करण्यात येईल.

७. धन्वंतरी योजनेमध्ये करारनामा करणा-या कोणत्याही रुग्णालयास पॅनलवर नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यामुळे असे निदर्शनास आलेले आहे की लहान रुग्णालयांमार्फत कोणत्याही किरकोळ कारणास्तव कर्मचा-यांना दाखल करुन घेण्यात येत आहे. सबब, यापुढे किमान २० खाटांची क्षमता असलेल्या रुग्णालयांनाच (स्पेशालिटी रुग्णालयांव्यतिरिक्त) पॅनलवर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच सद्यस्थितीत २० खाटांपेक्षा कमी संख्या असलेल्या (स्पेशालिटी रुग्णालयांव्यतिरिक्त) पॅनलवरील रुग्णालयांसमवेत केलेले करारनामे रद्द करुन त्यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमधून वगळण्याची कार्यवाही करण्यात यावी. याकामी अशा सर्व रुग्णालयांना ३ महिने कालावधीची वेळ देवून करारनामा रद्द करणेकरिता नोटीस पाठविण्यात यावी.

धन्वंतरी योजनेअंतर्गत पॅनलवर नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही रुग्णालयामार्फत सभासदांना आवश्यकता नसतांना अथवा अनैतीकपणे दाखल करुन घेण्यात आल्यास अशा रुग्णालयांना पॅनलवरुन काढून टाकण्यात यावे व त्यांचा काळ्या यादीमध्ये (Black List) समावेश करण्यात यावा. तसेच पॅनलवरील रुग्णालयांचे नियमितपणे तपासणी करण्यात यावी.

८. योजनेमध्ये समाविष्ट असलेले महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांची पती / पत्नी हे इतर कोणत्याही शासकीय / निमशासकीय अथवा खाजगी संस्थेमध्ये कामाला असतील व अशा अधिकारी व कर्मचा-यामार्फत धन्वंतरी योजनेअंतर्गत त्यांचे पती / पत्नीवर उपचार घेण्यात आल्यास सदर अधिकारी / कर्मचा-यांस त्यांचे पती / पत्नी कार्यरत असलेल्या शासकीय / निमशासकीय अथवा खाजगी संस्थेचा ना हरकत दाखला (No Claim Certificate) सादर करणे बंधनकारक राहील.

९. धन्वंतरी योजनेचे अद्यापपर्यंत सभासद नसलेल्या सेवानिलंबित / दिर्घ मुदतीसाठी वैद्यकीय रजेवर असलेल्या कर्मचा-यांना योजनेमध्ये समाविष्ट करुन घेणेकामी सर्व विभागप्रमुखांमार्फत

सेवानिलंबित / दिर्घ मुदतीचे वैद्यकीय रजेवर असलेल्या कर्मचा-यांची माहिती संकलित करुन ती धन्वंतरी कक्षास उपलब्ध करुन देण्यात यावी व अशा कर्मचा-यांचे सेवानिलंबनाचा तपशिल अभ्यासून त्यांना योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. तथापि, ज्या सेवानिलंबित कर्मचा-यांना योजनेमध्ये समाविष्ट करुन घेण्याचा निर्णय होईल अशा कर्मचा-यांनी त्यांची स्वहिश्शाची रक्कम व मनपा हिश्शाची रक्कम ही एकरकमी त्यांनी धन्वंतरी योजनेमध्ये भरणे आवश्यक राहील.

कोणत्याही प्रदीर्घ आजारामुळे अंथरुणाला खिळून असलेल्या रुग्णांना योजनेमध्ये समाविष्ट करुन घेण्यात यावे. तथापि, अशा कर्मचा-यांचा स्वहिस्सा हा दर ६ महिन्यांकरिता एकरकमी भरुन घेण्यात यावा. सदर तरतूद ही संगणक प्रणालीमध्ये करता येणे शक्य आहे किंवा कसे? याबाबत मुख्यलेखापाल यांनी तपासणी करुन शक्य असल्यास प्रणालीमध्ये सदरची तरतूद करुन घेण्याची कार्यवाही करावी. अथवा अशा प्रकरणांचे देखरेखीकरिता स्वतंत्र यंत्रणा स्थापित करावी.

१०. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेद्वारे माहे जानेवारी २०१६ ते एप्रिल २०१६ या कालावधीत खर्च झालेल्या र.रु. ७,१८,८७,७५४/- चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

११. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत विविध शस्त्रक्रियांकरिता आवश्यक असलेल्या Implants करिता दर निश्चित करण्यात यावेत व त्याची कमाल मर्यादा निश्चित करण्यात यावी. तसेच अशा निश्चित करण्यात येणा-या दरानुसारच रुग्णालयांना बिले अदा करण्यात यावीत. तथापि, निश्चित केलेल्या रकमेपेक्षा अधिक रकमेचे Implants, Stents, Lens, Disposable etc. बसविण्यात आल्यास त्याचा अतिरिक्त खर्च हा रुग्णालयांनी संबंधिताकडून वसूल करुन घ्यावा. कॅन्सर अथवा अवयव प्रत्यारोपण करण्यात आलेल्या रुग्णांकरिता आवश्यक असलेले औषधे / Implants करिता निश्चित करावयाची खर्चाची मर्यादा ही अधिकतम ठेवण्यात यावी. याबाबत यादी तयार करुन ती सर्व रुग्णालयांना कळविण्यात यावे.

१२. वाय.सी.एम. रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांमार्फत रुग्णांना ब्रॅण्डचे नावानुसार औषधे लिहून देण्यात येत असलेबाबत अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी तक्रार नोंदविलेली आहे. तथापि, याकामी वैद्यकीय अधिक्षक, वाय.सी.एम रुग्णालय यांनी परिपत्रक प्रसिध्द करुन सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णांना फक्त जेनेरिक / घटक नमूद करुन औषधे लिहून देण्यात येतील याबाबत कळविण्यात यावे.

१३. योजनेच्या सभासदांमार्फत कोणत्याही रुग्णालयामध्ये स्वतः अथवा त्यांचे नातेवाईकास विनाकारण दाखल करुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा रुग्णालयांवर शुल्लक उपचाराचे कारणास्तव दाखल करुन घेण्यासाठी दबाव आणल्याचे निदर्शनास आल्यास अशा कर्मचा-यांवर नियमाधीन प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. याकामी सर्व कर्मचा-यांना परिपत्रक प्रसिध्द करुन अवगत करण्यात यावे.

१४. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे बिलींग सॉफ्टवेअर ८ दिवसांमध्ये पूर्ण होणार असलेबाबत मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी कळविलेले आहे. तरी सदरचे सॉफ्टवेअर हे ८ दिवसात उपलब्ध करुन देण्यात येवून ते तातडीने कार्यान्वित करण्याची मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

१५. योजनेमध्ये बिलांची अदायगी करणेकरिता ९.५० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे त्याव्यतिरिक्त अधिकारी व कर्मचारी यांचा स्वहिस्सा दरमहा धन्वंतरी योजनेचे खात्यावर जमा होत आहे. तथापि, अद्यापर्यंत प्रत्यक्षात र.रु. ६,८८,६४,९८०/- ची बिले रुग्णालयांना अदा करण्यात आलेली असून र.रु. ८,५४,५६,६८४/- ची बिले प्राप्त झालेली आहे. म्हणजेच आजपर्यंत एकूण र.रु. १५,४३,२१,६६४/- इतका खर्च योजनेअंतर्गत झालेला आहे. त्यामुळे अतिरिक्त खर्चाची तरतूद करणेकामी विषय प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तथापि, सन २०१६-१७ या अंदाजपत्रकाती आजपर्यंत प्रत्यक्ष र.रु.२,०६,१२,१३२/- इतकी रक्कम खर्च झालेली असल्यामुळे तुर्तास अतिरिक्त तरतूद करण्याची आवश्यकता नाही. तरी भविष्यात आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेमार्फत योजनेकरिता अनुदान (Cross Subsidy) देण्यात येईल असे मा.आयुक्त यांनी सूचित केलेले आहे. याकामी धन्वंतरी कक्ष व लेखा विभाग यांनी संयुक्तपणे तपासणी करुन खर्चाची तरतूद करणे आवश्यक असल्यास आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करावी.

१६. कॅन्सरचे उपचाराकरिता आवश्यक असलेल्या Radiation चे दर निश्चितीकामी इनलॅक्स, आदित्य बिर्ला, दिनानाथ मंगेशकर व रुबी हॉल या रुग्णालयांकडून per sitting नुसार आकरण्यात येणार दर प्राप्त करुन घ्यावेत व त्यानुसार धन्वंतरी योजनेकरिता Radiation चे दर निश्चित करण्यात यावेत.

१७. धन्वंतरी योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या उपचारांचे / औषधांचे बिलांची अदायगी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे मान्यतेने करण्यात आलेली आहे. विषयपत्रिकेमध्ये नमूद असलेल्या अशा सर्व उपचारांचे / औषधांचे बिलांवर करण्यात आलेल्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

१८. शिक्षण मंडळ विभागातील सेवेत असणा-या व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये समाविष्ट करुन घेणेकामी मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. तसेच शिक्षण मंडळ विभागामार्फत त्यांचे सेवानिवृत्त कर्मचा-यांची मासिक वर्गणीदेखील कपात करण्यात येत आहे. परंतु शिक्षण मंडळ हा स्वायत्त विभाग असून त्यांचेकरिता स्वतंत्र अर्थसंकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांचे अर्थसंकल्पीय तरतूदीवर लेखा विभागाचे नियंत्रण नसल्यामुळे त्यांना धन्वतंरी योजनेमध्ये समाविष्ट करणे शक्य होणार नाही असे मुख्यलेखापाल यांनी नमूद केलेले आहे. सबब, शिक्षण मंडळ हा स्वायत्त विभाग असल्याने सदर योजना ही त्यांचेमार्फत शिक्षण मंडळ विभागाचे स्तरावर

स्वतंत्ररित्या राबविण्यात यावी तसेच मनपा हिश्शाची रक्कम हीदेखील शिक्षण मंडळाचे अर्थसंकल्पीय रकमेमधून अदा करण्यात यावी.

मुख्यलेखापरिक्षक

१९. श्रीमती पद्मश्री तळदेकर, मुख्यलेखापाल यांनी त्यांचे पतीने उपचाराकरिता त्यांना पुणे येथील खाजगी रुग्णालयात दाखल केलेले होते. परंतु सदरचे रुग्णालय हे धन्वंतरी योजनेचे पॅनलवर नसल्याने त्यांचे बिल नामंजूर करण्यात ओलेले होते. तथापि, श्रीमती तळदेकर यांनी मा.आयुक्त सो. यांना सदरचे बिल मंजूरीकामी विनंती केले असता मा.आयुक्त सो. यांनी विशेष बाब म्हणून सदरचे बिल मंजूर करणेस मान्यता दिलेली आहे. यासंदर्भात सर्व योग्य ती पूर्तता करुन बिल मंजूर करण्यात यावे.

२०. बाह्यरुग्ण विभागातून संदर्भित करण्यात येणा-या सिटी स्कॅन, एम.आर.आय. व लॅबचे तपासण्यांकरिता रुग्णांना वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्याची विनंती अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी केलेली आहे. त्याअनुषंगाने वाय.सी.एम. रुग्णालयात कार्यरत असलेल्या सिटी स्कॅन, एम.आर.आय. व लॅब तपासण्यांकरिता मे.रुबी ऐलकेअर यांचेशी करारनामा करुन अशा बिलांची अदायगी धन्वंतरी योजनेतून करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| चंद्रकांत इंदलकर<br>कामगार कल्याण अधिकारी<br>तथा सदस्य सचिव | रेखा गाडेकर<br>प्रशासन अधिकारी<br>सदस्य | ॲड. सतिष पवार<br>कायदा सल्लागार<br>सदस्य |
| पद्मश्री तळदेकर<br>मुख्यलेखापरिक्षक<br>सदस्य | प्रमोद भोसले<br>मुख्यलेखापाल<br>सदस्य | डॉ.मनोज देशमुख<br>वैद्यकीय अधिक्षक<br>सदस्य |
| मधुकर रणपिसे<br>सहखजीनदार, कर्मचारी महासंघ<br>तथा सदस्य | | मनोज माछरे<br>सहखजीनदार, कर्मचारी महासंघ<br>तथा सदस्य |
| डॉ. के अनिल रॉय<br>आरोग्य वैद्यकीय अधिकारी<br>तथा कार्याध्यक्ष | बबनराव झिंझुर्डे<br>अध्यक्ष, कर्मचारी महासंघ<br>तथा उपाध्यक्ष | दिनेश वाघमारे<br>आयुक्त<br>तथा अध्यक्ष |